

# के. के. वाघ अभियांत्रिकी येथे वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

## अभियांत्रिकीच्या २० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

**नाशिक : प्रतिनिधी**

**के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी येथे आय.ओ. सी.एल. कंपनीतर्फे नुकताच सतर्कता जागरूकता सप्ताह (व्हीजिलन्स वीक) ची सुरुवात करण्यात आली. दरवर्षी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त व्हीजिलन्स वीक साजरा केला जातो. यानिमित्ताने आय.ओ. सी.एल. कंपनीने के. के. वाघ अभियांत्रिकी येथे वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.**

सप्ताहाचा मुख्य उद्देश म्हणजे भारताला भ्रष्टाचारमुक्त देश बनवणे आणि भ्रष्टाचाराची समाजाला जाणीव करून देणे हा होय. या वक्तृत्व स्पर्धेचा विषय राष्ट्राच्या समृद्धीसाठी अखंडतेची संस्कृती/ सत्यनिष्ठा की संस्कृती से राष्ट्र की समृद्धी हा होता.

सर्वांत प्रथम प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी आय.ओ.सी.एल. कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक गुरुराज के., समरेश कुमार, के. आर. करुणाकरण, लता मारू आणि किरण खैरनार यांचे स्वागत केले.

यामध्ये २० हून अधिक विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी भ्रष्टाचारमुक्त भारत बनवू अशी प्रतिज्ञा घेतली. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. वर्षा तिडके व प्रा. स्नेहल जाधव यांनी कामकाज केले. प्रथम क्रमांक साक्षी तिडके, द्वितीय क्रमांक लक्ष्मी अहिरे आणि तृतीय क्रमांक श्रेया करोडे यांनी पटकावला. तसेच सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष मा. समीर बाळासाहेब वाघ, विश्वस्त मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी पारितोषिक मिळालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

गांवकरी ०५-१२-२०२४